





दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : १३९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०१ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# श्रीरामपूर शहरात भरदिवसा गोळीबाराचा थरार, बंटी जहागीरदार यांना संपवलं





**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, अहिल्यानगर :** श्रीरामपूर शहरात आज भर दुपारी झालेल्या थरारक गोळीबाराने संपूर्ण शहर हादरून गेले आहे. कब्रस्तानातील अंत्यविधी आटोपून घरी परतणाऱ्या असलम शब्बीर शेख उर्फ बंटी जहागीरदार यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी बेछूट गोळीबार केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या बंटी जहागीरदार यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे शहरात प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. दुपारी सुमारे अडीचच्या सुमारास बंटी जहागीरदार हे मित्र अमीन हाजी यांच्या दुचाकीवरून घरी परतत होते. संत लूक हॉस्पिटलच्या ओपीडी गेटजवळ आधीपासून दबा धरून उभ्या असलेल्या दोन हल्लेखोरांपैकी एकाने अचानक त्यांच्या दिशेने दगड फेकला. दगड लागल्याने बंटी खाली उतरले आणि त्यांनी तो दगड परत फेकताच क्षणार्धात हल्लेखोरांनी पिस्तुल काढून गोळीबार सुरू केला.

**पोट, पाय आणि पाठीवर घातल्या गोळ्या...**

हल्लेखोरांनी जवळून गोळीबार करत बंटी जहागीरदार यांच्या पोटात, पायाला तसेच पाठीवर गोळ्या झाडल्या. रक्ताच्या थारोळ्यात कोसळलेल्या बंटी यांना मागून येणाऱ्या नागरिकांनी तातडीने कामगार हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तेथे डॉ. जगधने आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न करत प्राथमिक उपचार केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना कार्डियाक व्हॅनद्वारे नगर येथील खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले.

**उपचारादरम्यान मृत्यू, शहरात खळबळ !**

नगर येथील रुग्णालयात उपचार सुरू असतानाच बंटी जहागीरदार यांनी अखेरची श्वास घेतला. ही बातमी वाऱ्यासारखी पसरताच श्रीरामपूरमध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. कामगार हॉस्पिटल, सय्यद बाबा चौक आणि मौलाना आझाद चौक परिसरात मोठ्या प्रमाणावर जमाव जमला होता. संभाव्य अनुचित प्रकार टाळण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. मृत्यूनंतर त्यांना आता संभाजीनगर येथील घाटी शासकीय रुग्णालयात मृतदेहाचे शवविच्छेदन पाठवण्यात आला आहे.

**पाच विशेष पथके आरोपींच्या शोधात...**

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिलेल्या माहितीनुसार, बंटी जहागीरदार यांच्या हत्येप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपींच्या शोधासाठी पाच विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. बंटी जागीरदार यांचे हल्ल्यामागचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

**काँग्रेसची सत्ता येण्यात बंटी जहागीरदार यांनी महत्त्वाची भूमिका**


बंटी जहागीरदार यांच्या कुटुंबाची राजकीय पार्श्वभूमी लक्षवेधी आहे. त्यांच्या आई राष्ट्रवादी काँग्रेसकडून नगरसेविका होत्या. नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत त्यांच्या भावजई काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आल्या असून श्रीरामपूर नगरपालिकेवर काँग्रेसची सत्ता येण्यात बंटी जहागीरदार यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याची चर्चा आहे. त्यामुळे ही हत्या वैयक्तिक वादातून की राजकीय वैमनस्यातून, याबाबत शहरात तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

**श्रीरामपूरमध्ये दहशतीचे वातावरण**

भर दुपारी झालेल्या या थरारक घटनेने श्रीरामपूरमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. आरोपींना लवकरात लवकर अटक करून कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

## येरवडा-लक्ष्मीनगर परिसरात मध्यरात्री दहशत

### कोयत्याने घरांवर हल्ला, २२ वाहनांची तोडफोड



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, येरवडा (पुणे) :** पुण्यातील येरवडा जय जवान नगर तसेच लक्ष्मीनगर परिसरात परिसरात मंगळवारी (३१ डिसेंबर) पहाटे गंभीर दहशतीची घटना घडली. लक्ष्मीनगर, जय जवाननगर आणि कामराजनगर या भागांत पहाटे ३.१५ ते ३.३० या वेळेत चार जणांच्या टोळीने धारधार कोयते आणि दगडांचा वापर करून घरांवर व वाहनांवर हल्ला केल्याने संपूर्ण परिसर हादरून गेला.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी सार्वजनिक रस्त्यावरून जात घरांच्या खिडक्यांवर कोयत्याने वार करून काचा फोडल्या. यावेळी जोरजोरात शिवीगाळ करत नागरिकांना जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या. हातातील कोयते दाखवत धमकी दिल्याने नागरिक भयभीत झाले. काही नागरिकांवर दगडफेक करून मारहाणीचा प्रयत्नही करण्यात आला.

या हल्लेखोरांनी केवळ घरांवरच नव्हे तर रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांवरही कोयत्याने वार केले. या प्रकारात जय जवाननगर व कामराजनगर परिसरातील एकूण ९ रिक्षा, १ टेम्पो आणि १२ दुचाकींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काही दुचाकी रस्त्यावर पाडून त्यांची तोडफोड करण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच लक्ष्मीनगर पोलीस ठाण्याचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. येरवडा विभागातील सहाय्यक पोलीस आयुक्तांसह वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी पहाटे घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. परिसरात तातडीने बंदोबस्त वाढवण्यात आला असून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न करण्यात आले.

या प्रकरणी लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. असून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आले आहे. या घटनेमुळे येरवडा परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

## धक्कादायक! १ कोटीसाठी व्यापाऱ्याचे अपहरण

**दि.३०, सिल्लोड :** बोदवड (ता. सिल्लोड) येथील भुसार व्यापाऱ्याचे अपहरण करून खून करून त्यांचा मृतदेह चाळीसगाव-कन्नड रस्त्यावरील घाटात खोल दरीत फेकून देऊन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याची घटना रविवारी रात्री नऊ वाजता घडली. सोमवारी पहाटे चार वाजता हा प्रकार उघडकीस आला.

अजिंठा पोलिसांनी या प्रकरणी पाच आरोपींना रविवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास छत्रपती संभाजीनगर येथील समृद्धी महामार्गावरील टोल नाक्यावर अटक केली.तुकाराम माधवराव गव्हाणे (वय ५५, रा. बोदवड, ता. सिल्लोड) असे खून झालेल्या व्यापाऱ्याचे नाव आहे. या प्रकरणी मृताचे काका उत्तमराव गव्हाणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वरून अजिंठा पोलिसांनी सोमवारी आरोपी सचिन नारायण बनकर (वय २५) , वैभव समाधान रानगोते (वय २३, दोघेही रा. गोळेगाव), अजिनाथ उर्फ अजय रखमाजी सपकाळ (वय २२, रा. पालोद), विशाल साहेबराव खरात (वय २३, रा. पानवडोद), दीपक कन्हैयालाल जाधव (वय २५, रा. लिहाखेडी) या पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

**नेमका काय प्रकार?**

आरोपींनी तुकाराम गव्हाणे यांचे २७ डिसेंबरला सायंकाळी ७.३० वाजता उंडणगाव ते बोदवड रस्त्यावर दुचाकी अडवून एक लाख रुपये लुटले होते. चाकूचा धाक दाखवून आरोपींनी गव्हाणे यांना एका कारमध्ये बळजबरी बसवून अपहरण केले होते. त्यांचा मुलगा कृष्णा व काका उत्तमराव गव्हाणे यांच्याकडे आरोपींनी गव्हाणे यांच्या फोनवरून संपर्क साधून एक कोटी रुपयांची खंडणी मागितली होती.

**मृतदेह खोल दरीत फेकला...** खंडणी रविवारी दुपारी तीन वाजेपर्यंत छत्रपती संभाजी नगर येथील मध्यवर्ती बस्थानक व नंतर बाबा पेट्रोल पंपाजवळ ठिकाण बदलून आणून देण्याची मागणी करण्यात आली होती. पैशांची जुळवाजुळव करण्यास वेळ झाल्याने तीन वाजेच्या आत खंडणी मिळाली नाही. त्यामुळे आरोपींनी रविवारी रात्री नऊच्या सुमारास चाळीसगाव घाटात तुकाराम गव्हाणे यांचा खून करून, मृतदेह खोल दरीत फेकून दिला.

## विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज- जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.३१, पेरणे फाटा (पुणे) :** पेरणे फाटा येथे १ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला विजयस्तंभ अभिवादन सोहळा शांतता आणि उत्साहात साजरा व्हावा यासाठी आवश्यक सर्व सुविधा प्रशासनातर्फे उपलब्ध करून देण्याची पूर्वतयारी करण्यात आली असून सोहळ्याच्या नियोजनासाठी प्रशासन सज्ज आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले.

श्री. डुडी म्हणाले, दरवर्षी साजरा होणारा विजयस्तंभ अभिवादन सोहळा हा महत्वाचा कार्यक्रम आहे. यावर्षी अधिक अनुयायी येण्याचे गृहीत धरून सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. सर्व अनुयायांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, म्हणून प्रशासन योग्य ती दक्षता घेत आहे. नियोजन करताना विविध संघटना आणि नागरिकांच्या सूचनाही लक्षात घेण्या आल्या आहेत. सोहळा शांतता, संयम आणि त्याच उंचीने साजरा करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही श्री. डुडी यांनी केले.

जिल्हापरिषदेच्यावतीने २३ आरोग्य केंद्र, ४३ रुग्णवाहिका, १८ खासगी रुग्णालयातील २८६ खाटा आरक्षित, १५५ प्रशिक्षित मनुष्यबळ, उपहारगृह व टँकरकरिता ३३ तपासणी पथके, ८० घंटागाडी, शुद्ध पाण्याची व्यवस्थेसाठी १५० टँकर्स, पाणी भरण्याच्या ठिकाणी २०० कर्मचारी नियुक्त, २ हजार ८०० शौचालय, २६५ सफाई कामगार, २६० पर्यवेक्षण अधिकारी व कर्मचारी, ९ हिरकणी कक्ष आदी सुविधा करण्यात आल्या आहेत. पेरणे, कोरेगाव भिमा ते पिंपळे जगताप रस्ता, ढगेवस्ती, कोरेगाव भिमा ते वाडेवस्ती आदी ठिकाणी रस्ते दुरुस्ती, पिण्याच्या पाणी भरण्याचे ठिकाणी मुरुम भरण्यासह शोषखड्डा करण्यात आले आहेत.

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्यावतीने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी १ महानिरीक्षक, ३ पोलीस उपमहानिरीक्षक, २० पोलीस उपायुक्त दर्जाचे अधिकारी, ८ राज्य राखीव पोलीस दल तुकड्या, ३ शिघ्र प्रतिसाद




दल, १४ घातपात विरोधी पथक, १८ बीडीडीएस पथके, ६५० होमगार्ड, ४ हजार ७०० पोलीस अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. संपूर्ण सोहळ्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता फेस रिकगनायजेशनकरिता २५१ ठिकाणी अत्याधुनिक सीसीटिव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. १९ ठिकाणी वाहनतळाच्या माध्यमातून २० हजार चारचाकी वाहनाची पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड शहर पोलीस आयुक्तालयाच्यावतीने ४ पोलीस उपायुक्त, ८ सहायक पोलीस उपायुक्त, ४५ पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक एकूण १७१, १ हजार ३२५ अंमलदार, वार्डन व होमगार्ड एकूण ६५०, २ सर्व्हेलन्स व्हॅन, ३ आरसीपी आणि १ शिघ्र प्रतिसाद दलातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक ग्रामीण कार्यालयाच्यावीने कायदा व सुवव्यस्थेच्यादृष्टीने शिरुर तालुक्यातील वढू बु. येथील छत्रपती शंभाजी महाराज व गोविंद गोपाळ महाराज यांच्या समाधीस्थळी अनुयायी दर्शनासाठी येतात. यादृष्टीने गर्दीवर नियंत्रण आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता कोरेगाव भिमा, वढु. बु. व शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत बंदोबस्ताकरिता ३३ वरिष्ठ पोलिस अधिकारी, ३३२ इतर पोलिस अधिकारी, ३ हजार १० पोलिस अंमलदार, १ हजार ५०० होमगार्ड, ४ राज्य राखीव पोलीस दल तुकड्या, १० स्ट्रायकींग फोर्स, ४ आरसीपी पथक, २ शिघ्र प्रतिसाद दल आणि ७ बीडीडीएस पथके नेमण्यात आली आहेत.

सुरक्षेच्या व निगराणीच्या दृष्टीने पोलिस विभागामार्फत सीसीटीव्ही कॅमेरे, ड्रोन कॅमेरे तसेच ध्वनीक्षेपण यंत्रणा आदी सुविधा करण्यात आली आहे. वाहनतळाचे ठिकाण, पिकअप व ड्रॉपचे ठिकाण, वॉच टॉवर्स, पोलीस मदत केंद्र, वज्र मोबाईल आदी व्यवस्था करण्यात आल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीसाठी अग्निशमन दल, रुग्णवाहिका तसेच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची पथके आदी यंत्रणा सुसज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

अहिल्यानगरमार्गे येणाऱ्या अनुयायांच्या वाहनांकरिता वक्फ बोर्ड तसेच मुंबई-नाशिक रोडकडून येणाऱ्या अनुयायांकरीता टोरंटो गॅस वाहनतळ आणि जातेगाव खु. चाकणरोड येथे, तर पोलीस व प्रशासन यांच्या वाहनांकरीता तोरणा वाहनतळ येथे व्यवस्था करण्यात आली आहे. कोरेगाव-भिमा येथून वढू बु. याठिकाणी जाणाऱ्या अनुयायांकरीता इनामदार पार्किंग, कोरेगाव भिमा येथून पीएमपीएमएलची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच पोलीस दलाच्यावतीने वाहतूक वळविण्याबाबत आदेश पारित केले आहेत.

पीएमपीएलच्यावतीने ३१ डिसेंबर २०२५ रोजी ३७५, तर १ जानेवारी २०२६ रोजी १ हजार २६० पीएमपीएल बसेसचे नियोजन केले आहे. प्रत्येक बसवर दोन कर्मचारी, राखीव चालक, तांत्रिक कर्मचारी मिळून अशी ४ हजार २०० कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

बार्टीच्यावतीने एकूण ३१० बुक स्टॉलची व्यवस्था करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने विजयस्तंभाला फुलांची सजावट, विद्युत रोषणाई, परिसर डागडुजी, पत्रकार कक्ष, मंडप, परिसर सुशोभिकरण आदी व्यवस्था करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, महावितरणने परिसरात विद्युत पुरवठा करण्यात आला आहे.

## निफाड तालुक्यात धक्कादायक घटना : विहिरीत आढळला पती - पत्नीचा मृतदेह

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३१, विंचूर (नाशिक) :** थेटाळे ता.निफाड येथे मध्यरात्रीच्या सुमारास विहिरीत तरुण पती - पत्नीचा मृतदेह आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत माजी पोलिस पाटील बाळकृष्ण पर्वत पवार यांनी लासलगाव पोलिस ठाण्यात खबर दिली की, दि.२९ डिसेंबर २०२५ रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास मयतांचे शेत गट क्रमांक ११४ मधील विहिरीत योगेश भाऊसाहेब शिंदे (वय ३५) व पत्नी सोनाली सोगेश शिंदे (वय ३२) हे दोघेही बुडालेल्या अवस्थेत आढळून आले आहेत. घटनेची माहिती मिळताच लासलगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे व पोलीस उपनिरीक्षक किरण साळुंखे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह विहिरीबाहेर काढून रुग्णवाहिकेद्वारे लासलगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ.अमोल राठोड यांनी तपासणीअंती दोघांनाही मृत घोषित केले. या घटनेप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात अ. मृत्यू रजि. नं. ६३/२०२५ भारतीय नागरी सुरक्षा संहिता कायदा कलम १९४ नुसार नोंद करण्यात आली आहे. सदर घटना ही घातपात





आहे की आत्महत्या याबाबत तर्क वितर्क लावले जात असून, याबाबत लासलगाव पोलिस अधिक तपास करीत आहेत. एकाच वेळी पती - पत्नीचा मृत्यू झाल्याने व त्यांचे पश्चात तीन अपत्ये अनाथ झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.




## वाहनांवर नियंत्रण आणायला हवे...



पुण्यात वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर असताना देखील खाजगी वाहन विक्रीत प्रत्येक वर्षी वाढ होत आहे. यंदा पुण्यात उच्चांकी सव्वातीन लाखांपेक्षा जास्त खाजगी वाहनांची विक्री झाल्याची नोंदणी प्रादेशिक परिवहन विभागाकडे (आरटीओ) झाली आहे. त्यामध्ये दुचाकी खरेदीमध्ये वाढ झाली असून पुण्यात दोन लाखांपेक्षा अधिक दुचाकींची खरेदी केल्याचे आढळून आले आहे. आधीच पुणे शहरात वाहनांची संख्या लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. त्यात या सव्वातीन लाख वाहनांची भार पडली आहे. पुणे शहरात सध्या ४१ लाखांहून अधिक वाहने आहेत.

केवळ पुणे शहरातच एका वर्षात सव्वातीन लाखांपेक्षा अधिक वाहनांची खरेदी झाली याचाच अर्थ राज्यातील इतर शहरातही वाहनांच्या खरेदीने उच्चांक केला आहे. पुण्यापेक्षा मुंबई, ठाणे या शहरात अधिक वाहनांची खरेदी झाल्याची शक्यता आहे. प्रत्येक शहरात साधारणपणे तीन लाख वाहनांची खरेदी झाल्याचे गृहीत धरले तरी हा आकडा खूप मोठा होतो. पुण्याप्रमाणेच मुंबई शहरातही वाहनांची संख्या अधिक आहे. मुंबईत चार चाकी आणि दुचाकी वाहनांची संख्या ५० लाखांच्या पुढे गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे शहरातील रस्ते अपुरे पडू लागली आहेत. शिवाय पार्किंगचीही मोठी समस्या निर्माण झाली आहे. मुंबईत गाड्या पार्क करण्यासाठी जी वाहनतळे आहेत त्यात साधारणपणे दहा हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात.

परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली आहे त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. पुण्यातही तीच परिस्थिती आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. वाढत्या वाहनांमुळे मुंबई, पुण्यातील प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे पण याची ना कोणाला फिकीर ना खंत. एकेकाळी पुणे शहर हे सायकलींचे शहर म्हणून ओळखले जायचे ती ओळख आता पुसली गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणाची पातळी कमालीची वाढली आहे. प्रदूषणामुळे दिल्लीची काय अवस्था झाली आहे ते आपण पाहतोच आहे, दिल्ली प्रमाणेच इतर शहरांची अवस्था व्हायला नको असेल तर वाहनांवर नियंत्रण आणायला हवे. वाढत्या वाहनांमुळे वाहतूक कोंडीचाही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. वाहतूक कोंडीमुळे पुणेकर त्रस्त आहेत. रस्त्यावर वाहनांच्या रांगांच्या रांगा लागलेल्या असतात.

नागरिकांनी नवीन वाहने विकत घेण्यापेक्षा बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर नागरिकांनी करायला हवा पण नागरिकांचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर विश्वास नाही. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नागरिकांना सक्षम सेवा देण्यात अपयशी ठरत आहे. म्हणून जो तो नवीन वाहन घेत आहे. पुण्या - मुंबई सारख्या शहरातील वाहनांची संख्या कमी करायची असेल तर बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने आपला कारभार सुधारून नागरिकांना योग्य सेवा द्यायला हवी. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. प्रशासनाने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम केल्यास पुण्या - मुंबईतील वाहनांच्या संख्येवर नियंत्रण येईल यात शंका नाही.

# संकल्प नवीन वर्षाचा !

**ॐ सर्वे भवन्तु सुखिनः।**
**सर्वे सन्तु निरामयाः।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु।**
**मा कश्चित् दुःख भाग्भवेत।।**

'सगळे सुखी होवोत, सगळे रोगमुक्त राहोत, सगळे चांगल्या आणि मंगल घटनांचे साक्षिदार बनोत आणि कोणाच्याच वाट्याला दुःख न येवो' असा हा या चार ओळींचा भावार्थ आपल्या प्रत्येकाला व्यापक होण्याची आणि सर्वांचे हित चिंतण्याची महान शिकवण देतो. नववर्षाचे स्वागत करताना भूतकाळातील सर्व हेवेदावे विसरून सर्वांनी हा संकल्प करायला हवा ! सामूहिक प्रार्थनेत आणि सामूहिक उपासनेत प्रचंड बळ असते. 'संघ शक्ती कलौयुगे' हा कलियुगाचा मंत्र आहे याचा अर्थ कलियुगात संघटनेतच सामर्थ्य आहे. जेव्हा एखादी प्रार्थना एकत्रितपणे समूहाने केली जाते तेव्हा त्यामध्ये संकल्पशक्ती निर्माण होते. अशी प्रार्थना फलद्रुप होण्याची शक्यता अधिक असते. सामूहिक प्रार्थनेने वातावरणात सकारात्मक स्पंदने निर्माण होतात आणि मनाला त्यातून सकारात्मक ऊर्जा मिळते.

सामूहिक प्रार्थनेचे महत्व आपल्याला शालेय जीवनापासून शिकवले जाते. शाळा भरण्याच्या आरंभी विद्यार्थ्यांकडून सामूहिक प्रार्थना करवून घेतली जाते जेणेकरून निर्माण होणाऱ्या सकारात्मक ऊर्जेने विद्यार्थ्यांच्या बुद्धीवरील आवरण नष्ट होऊन शालेय अभ्यासात त्यांचे मन लागावे. अनेक संप्रदाय, संघटना आणि संस्थांमध्येही सामूहिक उपासनेचे महत्व बिंबवले जाते, इतरांकडून ती करवून घेतली जाते. एकट्याने प्रार्थना करणे आणि तीच प्रार्थना सामूहिकपणे करणे यातील



परिणामकारकता भिन्न असू शकते. आपण जेव्हा एकट्याने प्रार्थना करतो तेव्हा मनातील विविध विचारांमुळे आपले मन भरकटून अन्यत्र जाऊ शकते. सामूहिक प्रार्थना करताना आजूबाजूला सर्वजण तीच प्रार्थना करत असल्याने आपले मन एकाग्र होण्यास साहाय्य होते त्यामुळे ती मनापासून होते परिणामी तिची परिणामकारकताही वाढते. कुतूहल म्हणून हा प्रयोग आपणही करून पाहू शकतो. एकट्याने आणि संघटितपणे प्रार्थना केल्यावर मनावर त्याचे काय पडसाद उमटतात हे आपण स्वतःही अनुभवू शकतो. देवाचीही आरतीही आपण एकत्रितपणे करतो त्यामुळे ती अधिक सात्विक होते. राष्ट्रगीत, देशाप्रतीची प्रतिज्ञाही आपण सामूहिकपणे घेतो. त्यामुळे यंदा नववर्षाच्या आरंभी सर्वांच्या कल्याणाकरिता सामूहिक प्रार्थना करूया !

संघटनेत बळ असते, त्यामुळे पशु पक्षी समूहाने राहतात. समूहाने वावरणाऱ्या पशु पक्ष्यांवर हिंस्त्र प्राणी हल्ला करताना विचार करतात. संघटनशक्तीचे महत्व बिंबवणारी काठीची आणि काठ्यांच्या मोलीची गोष्ट आपल्या लहानपणी आपण सर्वांनीच ऐकली असेल. संघटनेत सुरक्षा असते. देशातील जाती-पातीत विखुरलेल्या समाजाचा लाभ घेऊन मूठभर इंग्रजांनी आपल्यावर दीडशेहून अधिक वर्षे राज्य केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेचा संकल्प केल्यावर सर्वप्रथम विखुरला गेलेला मराठा आणि हिंदू समाज एका विचाराखाली एकत्र आणण्यास सुरुवात केली. आदिलशहा, मुघल बादशहा आदींच्या दरबारात चाकरी करणाऱ्या शूरवीर मराठा योध्यांचे प्रबोधन करून त्यांना स्वराज्यात सामील करून घेतले. आज पुन्हा हिंदू समाज जाती-पातींच्या आणि पक्षांच्या विभागणीत विखुरला गेला आहे. राजकीय मंडळी आपल्या राजकीय स्वार्थासाठी समाजात जाती-पातीचे विष पेरत आहेत. धर्मनिरपेक्षतेचे नको तेव्हढे अवडंबर माजवले जात आहे. त्यामुळे आज कोणीही उठतो आणि हिंदूच्या देवतांविषयी, सण-उत्सवांविषयी, प्रथा परंपरांविषयी नको ते बोलतो, अवतारांना आणि धर्मग्रंथांना काल्पनिक म्हणून हिणवतो, हिंदूंच्या प्रथा परंपरांना अंधश्रद्धेचे लेबल चिकटवून हिंदूंना डिवचण्याचा प्रयत्न केला जातो. हिंदूंची मंदिरे फोडणाऱ्या, तलवारीच्या धाकावर हिंदूंचे धर्मांतर करणाऱ्या आणि हिंदूंच्या बायाबापड्यांना नासवणाऱ्या आक्रमकांचा जाहीरपणे उदोउदो केला जातो. हिंदूंना देवतास्वरूप असणाऱ्या गोमातेच्या प्रतिदिन सर्रासपणे कत्तली केल्या जातात, हिंदूंच्या उत्सवांवर, मिरवणुकांवर बंधने आणली जातात. देशात ८० टक्के हिंदू असूनही आज हिंदूंची ही अवस्था आहे. ही स्थिती बदलण्यासाठी हिंदूंनी आज जाती-पातीची आणि पक्षांची बंधने झुगारून संघटित होणे नितांत गरजेचे आहे. हिंदू सहिष्णू आहे. विश्वबंधुत्वाची भावना त्याच्या रक्तातच आहे, त्यामळे संख्येने बहुसंख्य असूनही देशातील पंथनिरपेक्षता टिकून आहे. आज देशात सर्व जातीधर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत. आदर्श राज्य म्हणून आजही जगात ;रामराज्या'ची उपमा दिली जाते. संत ज्ञानेश्वर महाराज पसायदानातून विश्वाच्या कल्याणाचे देणे भगवंताकडे मागतात. या भारतभूमीत होऊन गेलेला सर्वच संत महात्म्यांनी आपल्या अभंगांतून आणि लिखाणातून भगवंताकडे विश्वाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली आहे. विश्वकल्याणासाठी विविध यज्ञयाग आणि होमहवन करण्याची संकल्पना हिंदू धर्माच्या शिकवणुकीचाच भाग आहे. याच व्यापक शिकवणीतून आज विश्वाच्या कल्याणासाठी, विश्वातील दारिद्र्य, दुःख, निराशा नष्ट होऊन प्रत्येक जण सुखी समाधानी आणि सज्जन होण्यासाठी भगवंताकडे प्रार्थना करूया !


**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# लोकनेते दि.बा.पाटील नवी मुंबई विमानतळ नामकरण करण्याची आश्वासने विरघळली ?

## वाचक पत्र

माजी खासदार आणि नवी मुंबई शहराचे भाग्यविधाते लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव नवी मुंबईतील विमानतळा द्यावे म्हणून स्थानिक ग्राम स्थांनी, त्यांच्या बांधवांनी, हितचिंतकांनी मागणी केली होती. लोकप्रतिनिधींनी सरकारकडे मागणी केली होती.

सातत्याने पाठपुरावा करून यश आले नाही, महाराष्ट्रात २९ महानगरपालिकांच्या निवडणूकांची धामधूम सुरू आहे. पालघर, ठाणे, रायगड जिल्ह्यातील



महानगरपालिका निवडणूकीत लोकनेते दि.बा.पाटील यांच्या समाज बांधवांनी नाराजी व्यक्त केली तर सत्ताधाऱ्यांना किती फटका बसेल हे आज सांगते कठीण आहे. आंदोलनात लोकप्रतिनिधींनी आश्वासने दिली होती, आणाभाका घेतल्या होत्या ते सर्व हवेत विरले असा समज दि.बा. पाटील समाजबांधवांचा झाला आहे. प्रसार माध्यमांनी प्रकरण उचलून धरले आहे. ग्रामस्थांमध्ये फुट पाडण्यासाठी विमानतळ बाधीत क्षेत्रातील ग्रामस्थांना विनामूल्य विमान प्रवास, भेट वस्तू देऊन फुट पाडण्याची कारस्थाने झाली. लोकनेते दि बा पाटील नवी मुंबई विमानतळ नामकरण व्हावे म्हणून एकजूट ठेवून इतिहास घडवणे लोकनेते दि.बा.पाटील यांच्या समर्थकांच्या हातात आहे.

**- महादेव गोळवसकर**
**कुर्ला मुंबई ९८६९४७६२०९**

## अभिनंदन..

गतवर्षाला निरोप
कृतज्ञ अभिवादन
नूतन वर्षा स्वागत
सुहास्यअभिनंदन

कसे असेल नवीन
हृदया वाढे स्पंदन
जुन्या आठवणींचे
मन मोहमय चंदन

गतकाळपाठीराखे
करे नीट विच्छेदन
काय कधी चुकले
ना चूक आच्छादन

अपूर्ण राहिलेकार्य
परिपूर्णत्वआवेदन
अमूक नसे लाभले
नको उगा आक्रंदन

नवीनवर्षात प्रयासे
करआनंदे संपादन
भूतकाळात रुताल
करत बसाल रूदन

तीव्र असो सदिच्छा
उपलब्धकैकसाधन
शोधे त्याला मिळते
विकल्पाचे संसधान

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# नवे वर्ष! नवे संकल्प!!

आज पासून नवीन वर्ष सुरू होत आहे. नवे संकल्प करणाऱ्यांसाठी आजचा दिवस हा शुभ मुहूर्त समजला जातो. नव्या वर्षात नवे संकल्प अनेक जण करतात. काहींचे संकल्प पूर्णत्वास जातात, तर काहींचे अर्धवट राहतात. एखादा व्यसनाधीन व्यक्ती ३१ डिसेंबरला आपल्या व्यसनाचा अमर्याद उपभोग घेऊन, १ जानेवारीपासून त्या व्यसनाचा त्याग करण्याचा संकल्प करतो.

कंबरेचा घेर वाढलेले काही स्थूल लोक दररोज व्यायाम करण्याचा संकल्प नववर्षाच्या मुहूर्तावर सोडतात. एखाद्या दैवताची पूजा दररोज करण्याचा संकल्प देखील काही जण करतात. भक्ती मार्गाला लागण्याचा त्यांचा हा संकल्प त्यांच्या आध्यात्मिक गरजेतून निर्माण झालेला असतो.तापट लोक आपल्या रागावर नियंत्रण ठेवण्याचा संकल्प करतात. मधुमेह असणारे लोक गोड पदार्थ वर्ज करण्याचा संकल्प करतात. संकल्प करताना काहींच्या मनाची तयारी खंबीर,तर काहींचे मन ढळमळीत असते. खंबीर निर्धार करणाऱ्यांसाठी त्यांचा हा संकल्प 'लाईफ चेंजिंग ' ठरतो.




त्यांच्या जीवनात गुणात्मक परिवर्तन होते. संकल्प हे खरंतर माणसाच्या दोन मनातील एक करार असतो. त्या दोन मनामध्ये एक असते मागे खेचणारे,निरुत्साही मन आणि दुसरे असते उत्साही, ध्येयवादी मन... या दोन्ही मनातील संघर्षामध्ये जेव्हा ध्येयवादी,उत्साही मन विजयी होते, तेव्हा त्या व्यक्तीचा संकल्प पूर्णत्वास जातो. 'स्वतःच्या मनावर तुम्ही राज्य करा; नाहीतर तुमचेच मन तुमच्यावर राज्य करेल', असं सांगितलं जातं. या वाक्यातूनच मनातील अंतर्द्वंद्व ध्यानात येतो. संकल्प करताना आपली प्रकृती, बौद्धिक कुवत आणि आर्थिक ऐपत इत्यादी गोष्टी पाहून आपण संकल्प केला पाहिजे. दररोज ५०० सूर्यनमस्कार घालण्याचा संकल्प किंवा दररोज दहा किलोमीटर धावण्याचा संकल्प आपल्या प्रकृतीला पहिल्या दिवसापासून पूर्ण करणे शक्य होणार नाही. त्यासाठी हळूहळू सुरुवात करावी लागेल. एखादी वाईट सवय मात्र झटक्यात सोडता येईल. बिडी-काडी अन् तंबाखू, गुटखा यासारखी व्यसनं एक जानेवारीला एका दिवसात सुटली जातील. पुढील वर्षभर फक्त त्याच्यावर ठाम राहावं लागतं.

**नवीन वर्षाचे असेही काही संकल्प करता येतील -**

१) दररोज कमीत कमी २० पाने वाचन करणे.

२) दररोज साडेतीन ते ५ पाच किलोमीटर चालणे अथवा धावणे.

३) बोलून विचार करण्यापेक्षा विचार करून बोलण्याची सवय लावणे.

४) गरजू लोकांना मदत करू.

५) नैसर्गिक साधन संपत्तीचा विनाश करण्यापासून स्वतःला रोखू.

६) स्वतःचे छंद जोपासण्यासाठी वेळ काढू.

७) मित्र, कुटुंबातील लोक आणि नातेवाईक यांना वेळ देऊ.

८) स्थानिक कलावंत, कारागीर आणि शेतकरी यांना प्रोत्साहित करण्यासाठी योग्य ती कृती करू.

९) व्यसनाधीन आणि वाम मार्गाला लागलेल्यांचे समुपदेशन करू.

१०) स्वतःच्या तसेच समाजाच्या आचार-विचारांचे नैतिक पातळीवर सतत मूल्यमापन करू.

आपले संकल्प पूर्ण होण्यासाठी पुढील गोष्टी जाणीवपूर्वक केल्या पाहिजेत -

१) आपल्या संकल्प पूर्ततेसाठी जवळच्या लोकांना आपल्या संकल्पात सामील करून घेतले पाहिजे. त्यामुळे त्या लोकांचा आपल्यावर दबाव राहील व त्यांची सोबत देखील मिळेल.

२) आपला संकल्प सर्वांसमोर जाहीर करा. यामुळे संकल्प पूर्ण करणे आणि त्यावर ठाम राहणे यामध्ये आपली प्रतिष्ठा पणाला लागेल.

३)संकप्ल पूर्ण करण्यासाठी काळजीपूर्वक नियोजन करा.

नववर्षाचे केलेले तुमचे सर्व संकल्प पूर्ण होओत, ही नववर्षाची आपणा सर्वांना शुभेच्छा!

**- किशोर जाधव,सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## कामळज येथील शिवारात बिबट्याचा मुक्त संचार गावातील शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.३१, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यांतील कामळज येथील शेतकरी अशोक आबाजी खानसोळे, साहेबराव दत्ता खानसोळे, प्रभाकर भोजू खानसोळे, बालाजी तानाजी खानसोळे, नागोराव मारोती खानसोळे, प्रकाश शंकरराव खानसोळे यांच्या शिवारात बिबट्याचा अनेक दिवसांपासून मुक्त संचार करीत असल्याचे दिसून येत आहे. या शेतकऱ्यांच्या शेतात बिबटया चे ठसे उमटले आहेत. तर शेतकरी साहेबराव खानसोळे व अशोक खानसोळे यांच्या शेतातील म्हशीचे वगार खाल्ले असुन या घटनेची वनविभागाला माहिती दिली असून वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडुन कोणतेच ठोस पावले उचलली नाही त्यांच्याकडून भ्रमणध्वनी केली असता त्यांच्याकडून उडवा उडवीचे उत्तर मिळत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष बिबट्या पाहिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतात जाण्यास भिती वाटत आहे. तरी या आठवड्यात रात्र पाळीची लाईट असल्यामुळे शेतकऱ्यांना आपला जीव मुठीत धरून शेतात काम करीत आहेत. त्यामुळे वनविभागाने तत्परतेने या घटनेची दखल घेऊन बिबटयाला आवर घालावी अशी मागणी ग्रामस्थांकडून व परिसरातील शेतकरी करीत आहेत.

## जि.प. कन्या शाळेच्या सुरक्षेसाठी मराठा प्रतिष्ठानचा पुढाकार

### सोयगाव येथे सीसीटीव्ही कॅमेरा भेट...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, सोयगाव :** येथे मराठा प्रतिष्ठान सोयगाव तसेच प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान दादा गव्हाडे, पाटील यांच्या वतीने जिल्हा परिषद कन्या शाळेस शाळा व विद्यार्थी सुरक्षेसाठी मोठा सीसीटीव्ही कॅमेरा भेट देण्यात आला. या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रवी काळे, नगरपंचायतचे नगरसेवक कदीही शहा व बंटी भाऊ काळे, ॲड.योगेश पाटील, शहरातील व्यापारी प्रमोद रावणे तसेच मराठा प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे उपस्थित होते. मराठा प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे यांच्या माध्यमातून हा कॅमेरा जिल्हा परिषद कन्या शाळेस प्रदान करण्यात आला. या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थिनींची तसेच शाळेच्या परिसराची सुरक्षितता अधिक बळकट होणार असून पालकांमध्येही समाधान व्यक्त करण्यात येत आहे. मराठा प्रतिष्ठानच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, भविष्यातही शिक्षण व सुरक्षेसाठी असेच उपक्रम राबविण्यात येतील, असे यावेळी सांगण्यात आले.

आजच्या काळात शाळा व विद्यार्थिनींची सुरक्षितता ही सर्वांत महत्त्वाची बाब आहे. जिल्हा परिषद कन्या शाळेतील मुली निर्भय वातावरणात शिक्षण घेऊ शकाव्यात, या उद्देशाने मराठा प्रतिष्ठानच्या वतीने सीसीटीव्ही कॅमेरा भेट देण्यात आला आहे. शिक्षणासोबतच सुरक्षा व्यवस्थेला बळकटी देणे हीच खरी सामाजिक जबाबदारी असून, भविष्यातही मराठा प्रतिष्ठान अशाच उपक्रमांद्वारे समाजहिताचे कार्य करत राहील, असे प्रतिपादन मराठा प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे यांनी केले.

## सबनवार विद्यालयात खरी कमाई

### स्काऊट गाईड अंतर्गत स्तुत्य उपक्रम...



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.३१, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथील कै. गंगाबाई पोतन्ना सब्बनवार हायस्कूल मध्ये स्वावलंबनाचे धडे आणि व्यावसायिक अनुभवाचा आनंद मिळावा म्हणून भारत स्काऊट आणि गाईडच्या वतीने 'खरी कमाई' हा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमाचे उद्घाटन माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक कल्याण गायकवाड यांनी केले तर याप्रसंगी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नागनाथ चेटलूरे तसेच कल्पक अकॅडमीचे संचालक प्रा. शेख अहेमद, गाईड मार्गदर्शिका सौ.येनगे व्ही.बी आणि स्काऊट मार्गदर्शक कवडेकर ए.वाय. तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना श्रम प्रतिष्ठेची जाणीव, स्वावलंबन, आर्थिक नियोजन आणि नेतृत्व कौशल्य शिकण्यास मिळाले. यातून विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान आणि समाजसेवेची प्रेरणा मिळाली म्हणून या उपक्रमाबद्दल सर्व स्तरावर विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे. विद्यार्थीनी व विद्यार्थी यांनी ढोकळा,चिवडा, जामून,मसाला पापड, पाणीपुरी, भेळ, बालूशाही व सँडविच इ.पदार्थांचे स्टॉल लावले. या उपक्रमातून २००० रुपये जमा झाले असून यातून विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान मिळाले व यानंतर सर्व सहभागी विद्यार्थी व विद्यार्थीनींनी सर्व परिसर स्वच्छ व निटनेटके करून सार्वजनिक स्वच्छतेबाबत जागरूकता दाखविले.

## मुदखेड्च्या केंद्रीय राखीव पोलीस दलात हर्बल पार्कचे उद्घाटन

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.३१, मुदखेड (नांदेड) :** शहरांतील केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालयाच्या (सीटीसी) मुदखेड येथील आवारात नव्याने बांधलेल्या हर्बल पार्कचे उद्घाटन पोलिस महानिरीक्षक तथा प्राचार्य ख्वाजा सजनुद्दीन यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी वेद प्रकाश त्रिपाठी, सीएएमआयटी, संदीप चव्हाण डीएफओ, नांदेड, यांच्यासह सीआरपीएफ कॅम्पसमधील अधिकारी, कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. उद्घाटन समारंभाला संबोधित करताना प्रमुख पाहुण्यांनी सांगितले की, हर्बल पार्क ही सध्याच्या काळाची एक महत्त्वाची गरज आहे. ते केवळ पर्यावरण संरक्षणाला चालना देणार नाहीत तर आयुर्वेदिक आणि औषधी वनस्पतींचे महत्त्व जनतेला पटवून देतील. या हर्बल पार्कमध्ये तुळस, अश्वगंधा, गिलॉय, कोरफड, कडुनिंब, आवळा, ब्राह्मी, अर्जुन आणि इतर अनेक औषधी आणि सुगंधी वनस्पती लावण्यात आल्या आहेत. प्रत्येक वनस्पतीच्या औषधी गुणधर्म आणि उपयोगांबद्दल माहिती त्यासोबत प्रदर्शित करण्यात आली आहे. या हर्बल पार्कच्या बांधकामासाठी आणि या पार्कच्या स्थापनेत सक्रिय सहकार्य केल्याबद्दल प्रमुख पाहुण्यांनी डीएफओ नांदेड आणि वन विभागाच्या इतर अधिकारी, कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# कृष्णवाडीत दिवसाढवळ्या बिबट्याचा थरार!

## झेड.पी. शाळेच्या विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला!

**: ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या :**

१. वन विभागाने तातडीने या भागात पिंजरा लावावा.

२. जिल्हा परिषद प्रशासन व ग्रामपंचायतीने शाळेच्या मागील बाजूस तात्काळ संरक्षण भिंत बांधावी.

३. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी जोपर्यंत बिबट्याचा बंदोबस्त होत नाही, तोपर्यंत विद्यार्थी शाळेत पाठवणार नाही आणि बिबट्या पकडे पर्यंत परिसरात गस्त वाढवावी.



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३१, विंचूर (नाशिक) :** हा खेळ बिबट्याचा.. रात्रीस आणि आता दिवसा खेळ चाले.. संपणार ना कधी हा खेळ बिबट्याचा? असा उद्विग्न सवाल सध्या निफाड तालुक्यातील शेतकरी आणि ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. कृष्णवाडी येथे काल दुपारी चक्क शाळेच्या आवाराजवळच बिबट्याचे दर्शन झाल्याने पालकांच्या काळजाचा ठोका चुकला आहे.

*** नेमकी घटना काय?**

निफाड तालुक्यातील कृष्णवाडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात काल (दि.२९ डिसेंबर) साधारण दुपारी १:०० वाजेच्या सुमारास ही धक्कादायक घटना घडली. शाळेच्या इमारतीला लागूनच मागील बाजूस मका आणि डाळिंबाची घनदाट बाग आहे. दुपारच्या सत्रात शाळा सुरू असताना अचानक शाळेच्या मागील बाजूस बिबट्याच्या डरकाळीचा आवाज आला.

या आवाजाने शिक्षक क्षिरसागर व केंद्रे आणि विद्यार्थी सतर्क झाले. खिडकीतून आणि सुरक्षित अंतरावरून पाहिले असता, एका कुत्र्यावर बिबट्यानी हल्ला केल्याचे ग्रामस्थ व शिक्षक यांच्या निदर्शनास आले. आणि नंतर मक्याच्या शेतात बिबट्याचा वावर असल्याचे शिक्षक व काही विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दिसून आले. दिवसाढवळ्या शाळेच्या अगदी जवळ बिबट्या दिसल्याने विद्यार्थी भयभीत झाले असून, शाळेच्या आवारात भीतीचे वातावरण पसरले आहे.

**संरक्षण भिंतीचा अभाव : विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात...**

सर्वात चिंतेची बाब म्हणजे, येथील जिल्हा परिषद शाळेला मागील बाजूस कोणतीही संरक्षण भिंत नाही. शाळेचे मैदान आणि शेतकऱ्यांची उभी पिके (मका व डाळिंब) यामध्ये कोणताही अडथळा नसल्याने, शेतात लपलेला बिबट्या सहज शाळेच्या आवारात येऊ शकतो. या असुरक्षिततेमुळे शाळा शिकावी की जीव वाचवावा? असा प्रश्न विद्यार्थ्यांसमोर उभा राहिला आहे.

घटनेची माहिती मिळताच पालकांनी शाळेकडे धाव घेतली. रात्रीची धुमाकूळ आता दिवसावर आली आहे, प्रशासनाला एखाद्या मोठ्या दुर्घटनेची प्रतीक्षा आहे का? असा संताप व्यक्त केला जात आहे. सद्यस्थितीत वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करावा आणि बिबट्याचा हा 'जीवघेणा खेळ' थांबवावा, अशी आर्त हाक कृष्णवाडीतील ग्रामस्थ देत आहेत.

## भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंती उत्सव व वार्षिक स्नेहसंमेलनाचे बक्षीस वितरण संपन्न






**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, बुलढाणा :** श्री शिवाजी विद्यालय तथा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय बुलढाणा येथे शिक्षण महर्षी कृषिरत्न डॉक्टर पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सव व वार्षिक स्नेहसंमेलनाचा बक्षीस वितरण कार्यक्रम दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी पार पडला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. प्रतापराव (बाबासाहेब) भोंडे आजीवन सभासद, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, बी. डी. काळे (आजीवन सभासद, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती) तर प्रमुख अतिथी म्हणून रवी राठोड( पोलीस निरीक्षक, शहर पोलीस स्टेशन बुलढाणा) अभिजीत शित्रे (सायंटिफिक ऑफिसर, भाभा अनुसंशोधन केंद्र, मुंबई) अनिल देवकर (उपशिक्षणाधिकारी, प्राथमिक बुलढाणा) डॉ. समीर पऱ्हाड (प्रसिद्धदंतरोगतज्ञ, बुलढाणा), तसेच शाळेचे माजी कर्मचारी धोरण सर, एल. डी.पाटील सर, मेढे सर, देशमुख मॅडम, खिर्डीकर भाऊ, तसेच विद्यालयाचे प्राचार्य कावरे सर व पर्यवेक्षक तथा शिक्षक प्रतिनिधी राजपूत सर, विज्ञान विभाग प्रमुख भोंडे सर, एच एस व्ही सी प्रमुख वाघ सर, मांगे बाबूजी हे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली. त्यानंतर विद्यालयाची वर्ग सातवी ची विद्यार्थिनी कु.अपेक्षा पाटील हिने डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवन कार्यावर अतिशय उत्कृष्ट भाषण केले. यानंतर कार्यक्रमाचे प्रस्ताविक विद्यालयाचे प्राचार्य कावरे सरांनी केले. यानंतर प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले अनिल देवकर यांनी स्पर्धेतून विद्यार्थ्यांची अंगी कला गुण कसे निर्माण होतात व ते विद्यार्थ्यांच्या अंगी राबवणे किती आवश्यक आहे तसेच अभ्यासात नेहमी सातत्य ठेवल्यास आपला विकास होतो याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यानंतर डॉ. समीर पऱ्हाड यांनी शाळेतील गोड विनोदी आठवणी सांगितल्या, त्यांच्या मते विद्यार्थी हा कधीच माजी नसतो. असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन त्यांनी केले. नंतर अभिजीत शित्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले संघर्ष प्रत्येकाच्या आयुष्यात असतोच व त्याला कसे सामोरे गेले पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांनी स्वबळावरच आयुष्यात प्रगती केली पाहिजे कोणावरही आपण अवलंबून नाही राहिले पाहिजे, हे युग स्पर्धेचे आहे त्यात विद्यार्थ्यांनी टिकून राहिले पाहिजे तसेच विद्यार्थ्यांनी मोबाईल, रील अशा गोष्टी पासून दूर राहिले पाहिजे असे विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर रवि राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एक जबाबदार नागरिक म्हणून आपली जबाबदारी काय असते याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले विद्यार्थ्यांनी अभ्यासात नेहमी सातत्य कसे राखले पाहिजे याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यानंतर अध्यक्षीय भाषण ॲड. प्रतापराव (बाबासाहेब) भोंडे (आजीवन सभासद, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. याप्रमाणे शिक्षणाचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. श्रीशिवाजी विद्यालयाच्या उभारणीत स्वर्गीय पंढरीनाथ पाटील साहेब, स्वर्गीय रा. दे. भोंडे (सरकार) अशा महान विभूतींनी मोलाचेकार्य कसे केले याविषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

त्यानंतर विविध उपक्रमात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक, मेडल, स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अस्मिता इंगळे मॅडम यांनी केले. तर आभार प्रदर्शन विद्यालयाचे पर्यवेक्षक तथा शिक्षक प्रतिनिधी राजपूत सर यांनी केले. त्यानंतर विद्यार्थ्यांचा आनंद मेळावा घेण्यात आला त्यात विद्यार्थ्यांनी भरभरून आनंद घेतला. या जयंती उत्सव व स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी खूप परिश्रम घेतले.

## नागपूर मनपा निवडणूकी साठी ग्रामीण भागातील शिक्षकांची नियुक्ती

### गुरुजी निवडणूक ड्युटीत, विद्यार्थी मात्र वाऱ्यावर!

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३१, नागपूर :** राज्यात १५ जानेवारी रोजी होणाऱ्या २९ महानगर पालिकांच्या निवडणुकांचा बिगुल वाजला आहे. मात्र, नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या प्रक्रियेत ग्रामीण भागातील मुख्याध्यापका पासून तर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात जुंपल्याने संताप व्यक्त केला जात आहे. या निवडणूक ड्युटीमुळे ग्रामीण भागातील शाळा-महाविद्यालये चक्क बंद ठेवण्याची वेळ शाळा महाविद्यालय प्रशासनावर आली आहे. जानेवारी महिना हा दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असतो अनेक शाळांनी या महिन्याच्या पहिल्या आणि दुसऱ्या आठवड्यात 'सराव परीक्षांचे' वेळापत्रक आधीच जाहीर केले असल्याची माहिती आहे. त्यातच १ जानेवारी २०२६ रोजी पहिले प्रशिक्षण आहे, त्यानंतर आठवडाभरात दुसरे प्रशिक्षण अपेक्षित आहे त्यामुळे ग्रामीण भागातील बहुतांश शिक्षक या प्रशिक्षणासाठी जाणार असल्याने सराव परीक्षा घ्यायच्या कशा असा प्रश्न शाळा महाविद्यालया समोर उभा ठाकला आहे.

नागपूर महानगरपालिकेची निवडणूक आहे त्यामूळे शहरातील शाळा महाविद्यालये आणि शासकीय कार्यालयांमधील कर्मचाऱ्यांची मदत घेणे अपेक्षित आहे. मात्र, निवडणूक विभागाने ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांवरही या कामाची जबाबदारी सोपवली आहे त्यामूळे ग्रामीण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्गात प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. एकीकडे सरकार गुणवत्तेच्या गप्पा मारते आणि दुसरीकडे परीक्षेच्या काळातच शिक्षकांना निवडणूक कामात व्यस्त ठेवून शाळा बंद ठेवण्याची परिस्थिती निर्माण करते हा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर अन्याय आहे.

शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी संघटनांनी या निर्णयाचा तीव्र निषेध केला आहे. ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांवरील निवडणूक कामाचा भार त्वरित कमी करावा आणि दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून पर्यायी व्यवस्था करावी अशी मागणी आता जोर धरत आहे यावर वेळीच तोडगा काढणे अपेक्षित आहे.

